# रयत शिक्षण संस्थेच्या शताब्दी निमित्त यशवंतराव चव्हाण इन्स्टिटय़ूट ऑफ सायन्स मध्ये माजी विद्यार्थ्यांच्या मेळाव्याचे आयोजन.

**साताराः** रयत शिक्षण संस्थेस ४ ऑक्टोबर २०१९ रोजी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. या संस्थेत शिक्षण घेतलेले लाखो विदयार्थी महाराष्ट्र राज्य व देशपातळीवरती अभिमानस्पद काम करत आहेत. याच संस्थेतील यशवंतराव चव्हाण इन्स्टिटय़ूट ऑफ सायन्स म्हणजेच पूर्वीचे सायन्स कॉलेज सातारा. या महाविद्यालयात गेल्या ५५ वर्षामध्ये हजारो विद्यार्थी विज्ञानाचे शिक्षण घेवून वेगवेगळया क्षेत्रामध्ये देशाच्या व राज्याच्या विकासामध्ये मोलाची भर टाकत आहेत. महाविद्यालयाने दोन नॅक च्या मुल्यांकनामध्ये ए ग्रेड व तिसऱ्या मूल्यांकनामध्ये ए प्लस ग्रेड मिळवली आहे तसेच या महाविद्यालयाला २०१८ पासून स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा मिळाला आहे व नजीकच्या काळात रयत शिक्षण संस्थेचे "कर्मवीर भाऊराव पाटील" क्लस्टर विद्यापीठ (अनुदानित) म्हणून कार्यरत होणार आहे यशवंतराव चव्हाण इन्स्टिटय़ूट ऑफ सायन्स हे महाविद्यालय महाराष्ट्रातीलाच नव्हे तर देशातील नामांकित महाविद्यालय म्हणून नावारुपाला आले आहे. या महाविद्यालयामधून शिक्षण घेतलेले विद्यार्थी हे नामवंत शास्त्रज्ञ डॉक्टर, इजिनिअर विविध कंपनीतील अधिकारी व उदयोजक म्हणून कार्यरत आहेत. याचा आम्हा सर्वाना, अभिमान आहे अशा सर्व विदयार्थ्यांचा स्नेहमेळावा महाविद्यालयात आयोजित केला आहे. अशा सर्व विद्यार्थ्यांनी संस्थेच्या शताब्दी निमित्त आपण शिक्षण घेतलेल्या आपल्या विभागास भेट देऊन मार्गदर्शन करावे. खाली दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे आपण महाविदयालयात येऊन महाविदयालयाची शोभा वाढवावी या वेळापत्रकाप्रमाणे आपण आपल्या सातारा होम टाऊन घरी सहकुटुंब गणेशविसर्जना निमित्ताने आला असल्यास अथवा सुप्रसिध्द कास पठाराला भेट देण्यासाठी सहकुटुंब आला असाल तरीही आपण महाविद्यालयास भेट द्यावी ही आग्रहाची विनंती.

रयत शिक्षण संस्थेच्या शताब्दी वर्षानिमित्त महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा वेगवेगळया चार गटामध्ये आयोजित केला आहे.

रविवार दि.८ सप्टेंबर २०१९ रोजी सन १९५७ ते १९८५पर्यंतच्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा. सकाळी १०.वाजता, सन १९८६ ते २००० पर्यंतच्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा सोमवार दि.९ सप्टेंबर २०१९ रोजी दुपारी ३.०० वाजता, तसेच सन २००१ ते २०१० पर्यंतच्या विद्यार्थ्यांचा मेळावा शुक्रवार दि.१३/०९/२०१९ रोजी दुपारी ३.०० वाजता आणि सन २०११ नंतरच्या सर्व माजी विद्यार्थ्यांचा मेळावा.शनिवार दि.१४/०९/२०१९ रोजी दुपारी ३.०० वाजता महाविद्यालयामध्ये आयोजित करण्यात आले आहेत.

या मेळाव्यांच्या निमित्ताने शिक्षक माजी व विद्यार्थ्यांच्या जुन्या ओळखी व आठवणींना उजाळा मिळेल तसेच महाविद्यालयाला माजी विद्यार्थ्यांच्या अनुभवाचा विविध प्रकारे लाभ घेता येवू शकेल आणि महाविद्यालयाच्या विकासासाठी त्यांच्या सूचनांचा फायदा होईल. तरी महाविद्यालयाच्यावतीने सर्व माजी विद्यार्थ्यांनी या मेळाव्यांना उपस्थित राहून महाविद्यालयाच्या प्रगतीमध्ये आपला सहभाग नोंदवावा असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य.डॉ.के.जी.कानडे यांनी केले आहे.

---

जा.क्र. / / २०१९-२० दि.४/०९/२०१९

प्रति,
मा. संपादक
दैनिक पुण्यनगरी
सातारा.
महोदय,

सदरची बातमी आपल्या दैनिकात प्रसिध्द करणेविषयी विनंती आहे.

कळावे

आपला विश्वासू

प्राचार्य,
यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स,
सातारा.